<u>अत्यंत तातडीचे</u>

माहितीचा अधिकार

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.
नागरी सुविधा केंद्र.
क्र.नासुकें/१/कावि/८५/२०२१
दिनांक :- १०/०३/२०२१

विषय :- <u>माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ४ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीबाबत</u>...

<u>परिपत्रक</u>

शासन परिपत्रक **क्र.संकिर्ण २०१५/प्र.क्र.(२५२/१५) सहा. दि.२८/०१/२०१६** अन्वये **माहितीचा अधिकार अधिनियम,** २००५ मधील कलम ४(१)(क) मधील तरतुदींनुसार माहितीचा अधिकार मिळणे सोईचे होईल अशा रितीने आणि स्वरुपात अभिलेखे सुचिबद्ध करणे, त्याची निर्देशसूची तयार करणे आणि त्याचे संगणकीकरण करणे योग्य आहे अशा अभिलेख्याचे संगणकीकरण करणे व ते देशातील विविध प्रणालींमध्ये नेटवर्कमार्फत जोडणे आवश्यक असून अधिनियमातील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ बाबींवरील माहिती सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी तयार करुन ती प्रसिद्ध करणे अनिवार्य असलेबाबत कळविले होते.

तसेच, **माहितीचा अधिकार अधिनियम,** २००५ अन्वये अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने दरवर्षी किमान दोन वेळा आणि अधिकारी संदर्भातील जसे बदल्यांविषयक माहिती वेळोवेळी अद्ययावत करणेबाबत सदर शासन परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे होते. त्यानुसार मनपाच्या सर्व विभागांना वारंवार परिपत्रकान्वये सूचित करण्यात आले आहे.

शासन परिपत्रक **क्र.संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१५/नवि-२० दि.२१/०१/२०२१** अन्वये शासनाकडून शासनाच्या विविध विभाग / कार्यालयात portals, applications, software वगैरे स्वरुपात उपलब्ध असलेली सार्वजनिक स्वरुपाची माहिती प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांचे वेबपोर्टलवर प्रसिद्ध करुन त्यामध्ये वेळोवेळी होणारे बदल अद्ययावत करणेबाबत कळविले आहे.

मा.विभागीय आयुक्त, विधानभवन पुणे यांचेकडील क्र.नपाप्र/नपा-४/कावि/१७८/२०२१ दि.२५/०२/२०२१ अन्वये उपरोक्तप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५ प्रमाणे आवश्यक माहिती मनपा संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत कळविणेत आले आहे.

सबब, या परिपत्रकान्वये सर्व विभागप्रमुख / प्रथम अपिलीय अधिकारी / जन माहिती अधिकारी व संबंधितांना सूचित करण्यात येते की, अर्जदारांना माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टीने **माहितीचा अधिकार अधिनियम,** २००५ मधील कलम ४(१)(ख) मध्ये दर्शविलेल्या १७ बाबींवरील आपल्या विभागाची माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर अद्ययावत करणेत येऊन **सोबत पाठविलेल्या शासनाकडील परिपत्रकान्वये व विभागीय आयुक्त कार्यालयाकडील पत्रान्वये** कार्यवाही करणेत यावी.

...२

Scanned with CamScanner

तसेच, दरवर्षी किमान दोन वेळा म्हणजेच दिनांक **१ जानेवारी व दिनांक १ जुलै** रोजी असे वर्षातून किमान दोन वेळा व अधिकारी संदर्भातील जसे बदल्यांविषयक व इतर कामकाज वाटपामुळे झालेल्या बदलांबाबतची माहिती वेळोवेळी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर (www.pcmcindia.gov.in) अद्ययावत करावी. याबाबत तांत्रिक अडचणी उद्भवल्यास माहिती व तंत्रज्ञान विभागाशी तातडीने संपर्क साधून निराकरण करावे.

१७/७/२१

(राजेश पाटील)
**आयुक्त,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रति,

सर्व विभागप्रमुख,

------------------------------------------------ विभाग

सोबत :- शासनाकडील परिपत्रक व विभागीय आयुक्त कार्यालयाकडील पत्र.

प्रत :- माहिती व तंत्रज्ञान विभाग

२/- माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४(१)(ख) नुसार मनपाच्या विभागांकडून १ ते १७ बाबी **अद्ययावत केलेल्या विभागांची व अद्ययावत न करणाऱ्या विभागांची यादी** उलट टपाली पाठविणेत यावी.

Scanned with CamScanner

प.(9)

**केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1) (ख) मधील १ ते १७ बाबी जनतेस स्वयंप्रेरणेने प्रसिद्ध करावयाची नियम पुस्तिका (मॅन्यूअल)**

| | |
|---|---|
| 1 | कार्यालयाचा तपशिल,कामकाज आणि कर्तव्ये |
| 2 | कार्यालयाचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार आणि कर्तव्ये |
| 3 | निर्णय प्रक्रियेसाठी अनुसरली जाणारी पद्धत पर्यवेक्षण आणि जबाबदारी |
| 4 | कामकाज पूर्तता करण्यासाठी विहित केलेले निकष |
| 5 | कामकाज कार्यवाही करण्यासाठी कर्मचा-यांकडून वापरण्यात येणारे नियम,अटी,निर्देश,नियमावली आणि अभिलेख |
| 6 | उपलब्ध असलेल्या अथवा अधिपत्याखाली असलेल्या दस्तऐवजाच्या (अभिलेखाच्या) वर्गवारीची यादी |
| 7 | धोरणात्मक बाबी निश्चित करण्यासाठी अथवा त्यांची अंमलबजावणी करण्यासंबंधात जनतेच्या प्रतिनिधीत्व अथवा सल्लामसलत हेतूर्थ अस्तित्वात असलेल्या व्यवस्थेचे तपशिल |
| 8 | कार्यालयाचा भाग म्हणून अथक सल्लामसलतहेतूर्थ नेमलेली दोन किंवा अधिक व्यक्तींचा समावेश असलेली मंडळे,परिषदा समित्या आणि इतर संस्था यांची यादी आणि अशा मंडळ,परिषदा समित्या व इतर यांच्या बैठका जनतेस खुल्या आहेत किंवा अशा बैठकांचे इतिवृत्त जनतेस सुसाध्य असल्यास त्याची यादी |
| 9 | अधिकारी व कर्मचारी यांची नामदर्शिका |
| 10 | नियमांतर्गत प्रत्येक अधिकारी आणि कर्मचारी यांना प्रतिमाह मिळणारे वेतन मोबदल्याच्या पद्धतीसह |
| 11 | सर्व योजना,प्रस्तावित खर्च आणि संस्थांना केलेल्या वाटपाचा अहवाल याचा तपशिल दर्शविणारी अंदाजपत्रकातील तरतूद |
| 12 | द्रव्यसहाय्य,कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची पद्धत वाटपाची रक्कम आणि अशा कार्यक्रमाच्या उपभोक्त्यांचा तपशिल |
| 13 | कार्यालयातर्फे कायदेशीर हक्क,परवाने व सवलती प्राप्तकर्त्याबाबत तपशिल |
| 14 | कार्यालयात उपलब्ध असलेल्या अशा माहितीचे तपशिल जे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात रुपांतरीत केले आहेत |
| 15 | माहिती प्राप्त करण्यासाठी नागरीकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचे तपशिल यात जनतेच्या वापरासाठी नागरीकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचे तपशिल यात जनतेच्या वापरासाठी वाचनालय अथवा ग्रंथालय चालवले जात असेल तर त्याच्या कामकाजाची वेळ अंतर्भूत आहे |
| 16 | सार्वजनिक माहिती अधिकारी यांचे नांव,पदनाम व इतर तपशिल |
| 17 | इतर उपयोगी माहिती |

Scanned with CamScanner

प.५०

# विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,
## विधान भवन, पुणे
(नगरपालिका प्रशासन शाखा)

दूरध्वनी क्रमांक:- ०२०/२६३६२३३१ email ID-rdmapune@gmail.com

क्रं.नपाप्र/नपा-४/कावि/१७८/२०२१ दिनांक :२५/०२/२०२१

प्रति,

१) मा.आयुक्त,महानगरपालिका (सर्व),पुणे विभाग
२) मा.महानगर आयुक्त,महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,पुणे
३) मुख्य कार्यकारी अधिकारी,पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण,पुणे
३) जिल्हा प्रशासन अधिकारी (सर्व), पुणे विभाग
४) मुख्याधिकारी, (सर्व), पुणे विभाग

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ प्रमाणे स्वयंप्रेरणेने माहिती प्रसिध्द करणेबाबत..

संदर्भ : १.कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण-२०२०/सं.क्र.११५८/नवि-० दि.२१/१२/२०२० (ई-मेल अन्वये प्राप्त दि.१९/०१/२०२१)
२.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.संकीर्ण-२०२-प्र.क्र.१५/नवि-२० दि.२१/१/२०२१(इमेल द्वारे प्राप्त दि.१०/२/२०२१)
३.मा.सहायक आयुक्त नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचे दि.०८/२/२०२१ रोजीचे पत्र.

आयुक्त कार्यालय
आवक क्र.- २८९४
दिनांक- २/३/२१
विभाग- CFC
लिपिक-
प्रशा. अधि.-
मा. आयुक्त-

महोदय,

उक्त नमूद विषयास अनुसरुन आपणास कळविणेत येते की, सामान्य प्रशसन विभाग,मंत्रालय यांचेकडील पत्र क्रसंकीर्ण-२०२०/प्र.क्र.४५/का.सहा दि.२५नोव्हेंबर २०२० अन्वये प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने संबधित कार्यालयातील Portals,Applications,Software अथवा अन्य स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीपैकी,माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ प्रमाणे कोणती माहिती उपलब्ध करुन दयावी याबाबत निर्णय घेऊन आवश्यक माहिती संकेतस्थळावर माहित प्रसिध्दी करावी असे निर्देश दिले आहे.सोबत सदर पत्राची प्रत सहपत्रासह सादर केली आहे. त्याअनुषंगाने आपण आले स्तरावर कार्यवाही करावी ही विनंती.

आपला,

(डॉ.प्रदीप ठेंगल)
प्र.प्रादेशिक उपसंचालक,
नगरपालिका प्रशासन,
पुणे विभाग पुणे

नागरी सुविधा केंद्र
आवक क्रमांक - ९१२
दिनांक - ५/३/२०२१
टेबल क्रमांक - 1
लिपिक -
लेखापाल / मुख्य लिपिक -
मा. व तं. अधिकारी -
मुख्य मा. व तं. अधिकारी -

८५
८/३/२०२१

LETTERS-2021



Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-३२.

दूरध्वनी क्रमांक :- ०२२-२२७९४२०७ Email ID :- mohsin.bagwan@nic.in

---

क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१५/नवि-२० दिनांक:- २१ जानेवारी, २०२१.

प्रति,

(१) आयुक्त, सर्व महानगरपालिका,
(२) आयुक्त तथा संचालक,नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-३०.

विषय:-माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ प्रमाणे स्वयंप्रेरणेने माहिती प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ:-(१) नगर विकास विभाग यांचे पत्र क्रमांक संकिर्ण-२०२०/सं.क्र. ११५८/नवि-०३, दिनांक २१.१२.२०२०.

(२) सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्रमांक संकिर्ण-२०२०/प्र.क्र. ४५/का. सहा., दिनांक २५.११.२०२०.

महोदय,

उपरोक्त विषयानुषंगे नगर विकास विभाग यांचे दिनांक २१.१२.२०२० रोजीचे अग्रेषित पत्र व त्यासोबतचे सहपत्रचे कृपया अवलोकन व्हावे.

०२. सदर पत्रातील सुचनेप्रमाणे आपल्यास्तरावर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीबाबत शासनास अवगत करावे, ही विनंती.

आपला,

(आर.एम.परदेशी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत:- वरील प्रमाणे

Desktop-Arvind Pawar-२०२१, प्र.क्र. १५-२०२१

Scanned with CamScanner

महाराष्ट्र शासन

क्र:- संकिर्ण २०२०/सं.क्र.११५८ /नवि-०३
नगर विकास विभाग, ४ था मजला
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २१/१२/२०२०.

प्रति,

सर्व सह सचिव /उप सचिव /अवर सचिव /कक्ष अधिकारी,
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई.

विषय :- माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४ प्रमाणे स्वयंप्रेरणेने माहिती प्रसिद्ध करणेबाबत.

संदर्भ :- सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, यांचे पत्र क्र. संकिर्ण २०२०/ प्र.क्र. ४५/ का.सहा दि. २५ नोव्हेंबर, २०२०.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधीन पत्राची प्रत सोबत जोडली आहे.

०२. प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने संबंधित कार्यालयातील Portals, Applications, Software अथवा अन्य स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीपैकी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ प्रमाणे कोणती माहिती उपलब्ध करुन द्यावी याबाबत निर्णय घेऊन आवश्यक माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करावी, असे सामान्य प्रशासन विभागाने उपरोक्त पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

०३. त्यानुषंगाने आपल्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, नगर परिषदा, नगर पंचायती, महामंडळे, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नगररचना व मुल्यनिर्धारण संचालनालय, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण यांना आपल्या स्तरावरुन कळवावे, ही विनंती.

(महेश म.लाड)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- सहपत्र

C:\USERS\JITENDRA.PIMPLE\DESKTOP\R\UD 3.DOCX

Scanned with CamScanner

४७७२/२०२०

E-4510572

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
१९ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२. दूरध्वनी क्र. ०२२-२२०४९५४३

दिनांक २५ नोव्हेंबर, २०२०

क्र. संकीर्ण२०२०/प्र.क्र.४५/का.सहा

प्रति,
सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई

**विषय- माहितीचा अधिकार अधिनियम कलम ४प्रमाणे स्वयंप्रेरणेने माहिती प्रसिध्द करणेबाबत**

महोदय,

श्री. सुमित मलिक, राज्य मुख्य माहिती आयुक्त यांनी मुख्य सचिव यांना पाठविलेले दिनांक ९.१०.२०२०चे पत्र व त्यासोबत श्री. भास्कर प्रभू, श्री. शैलेश गांधी व इतर यांनी राज्य मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई यांना पाठविलेले दिनांक ३०.९.२०२०, २९.९.२०२० व दि. १५.९.२०२०चे ई मेल पत्रेही सोबत जोडली आहेत.

२. सदर पत्रान्वये शासनाच्या विविध विभागांमध्ये वापरले जाणारे MIS System व Software बाबतचे MIS Dashboards जनतेस accessible असावेत अशी मागणी केली आहे.

३. शासनाच्या विविध विभाग/कार्यालयात portals, applicatious, software वगैरे स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीपैकी काही माहिती वैयक्तिक स्वरुपाची असते. काही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असते. यास्तव प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने संबंधित कार्यालयातील portals, applications, software अथवा अन्य स्वरुपात उपलब्ध असलेल्या माहितीपैकी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५च्या कलम ४ प्रमाणे कोणती माहिती उपलब्ध करुन द्यावी याबाबत निर्णय घेऊन आवश्यक माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. तसेच सदर माहिती वेळोवेळी अद्ययावत करण्यात यावी.

४. उपरोक्त बाबी सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख, सार्वजनिक प्राधिकरणे व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात व आवश्यक कार्यवाही करण्याबाबत त्यांना सुचित करावे.

आपला

(ज.जि.वळवी)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र: वरीलप्रमाणे

प्रत- कार्यासन ६ संग्रहार्थ.

Scanned with CamScanner

# MAHARASHTRA STATE INFORMATION COMMISSION

सूचना का अधिकार

13th floor, New Administrative Building,
Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
opp. Mantralaya, Mumbai- 400 032
website : sic.maharashtra.gov.in

TEL. 222049184 FAX NO.22049390

No.SCIC 2020/Inward No. 10/01, Date : 09.10.2020

09 OCT 2020

TO,
The Chief Secretary,
General Administration Department,
Mantralaya, Madam Cama Road,
Hutatma Rajguru Square,
Nariman Point, Mumbai-400032.

12-10-05

मुख्य सचिवांचे कार्यालय
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक :9 OCT 2020

4454986

2071 / 14.10

**Sub:** To file say/reply to Complainant's Complaint under section 18 of the RTI Act, 2005.

**Ref:** Complaint under section 18 of the RTI Act, 2005 dated 06/09/2020.

D.S.(V)

The Complainant has filed a Complaint (copy attached) before the Hon'ble Chief Information Commission, Maharashtra. In addition to that complaint the Complainant has also filed additional complaint that there are various MIS systems and software being used in government department and the MIS Dashboards. The Complainant states that all the said software and MIS systems to be updated and access to that to be given to the public. The Complainant has earlier filed the complained about the Covid Centers, Hospitals, etc. and the officers/Public authorities who are working in response to the covid-19 pandemic functioning under your control and are not paying enough attention to the implementation of the RTI Act, and that there is a serious lapse in the time bound compliance provisions of section 4(1)(b) of the RTI Act. Kindly provide your say or reply on this Complaint within 15 days.

श्री- जाधव
14/10/2020

(Sumit Mullick)
**Chief State Information Commissioner,**
**Maharashtra State**

प्र.स. (सं.व का.)

13-10

Scanned with CamScanner